# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## इतिहास विभाग

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, पुणे- ४११००७**

०२०-२५६२१५६१ hodhistory@unipune.ac.in


**१४- ०२-२०२६**

प्रति,
मा. प्राचार्य/ इतिहास विभागप्रमुख
सर्व महाविद्यालये
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.
महोदय,

इतिहास विभाग व इतिहास अभ्यास मंडळ , सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने गुणवत्ता सुधार कार्यक्रमाअंतर्गत दि. ५ व ६ मार्च २०२६ रोजी "आधुनिकपूर्व भारतातील ऐतिहासिक ज्ञाननिर्मिती: अद्ययावत् सिद्धांतन" या विषयावर विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले आहे. या चर्चासत्रात महाराष्ट्र, तमिळनाडू, केरळ, आसाम इत्यादि राज्यांमधील निमंत्रित तज्ञ आपले संशोधन सादर करणार आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने द्वितीय वर्ष बी. ए. (इतिहास) या अभ्यासक्रमातील भारतीय ज्ञानव्यवस्था (IKS) या विषयाच्या आकलन व अध्यापनाच्या दृष्टीने या चर्चासत्रातील मांडणी प्राध्यापकांना उपयुक्त ठरेल.

या चर्चासत्रात सहभागी होण्यासाठी मोफत नोंदणी अनिवार्य आहे. सर्व नोंदणीकृत सहभागींना दुपारचे जेवण व चहा दिला जाईल. निवासव्यवस्था मर्यादित असल्याने फक्त महिला सहभागींसाठी विद्यापीठ परिसरात निवास उपलब्ध करता येईल. सर्व सत्रांमध्ये सहभाग नोंदवणाऱ्या सहभागींना सांगता समारंभानंतर प्रमाणपत्र मिळेल.

या चर्चासत्रासाठी नोंदणी करण्यासाठी पुढील फॉर्म भरावा. फॉर्म भरण्याची शेवटची तारीख २५ फेब्रुवारी आहे. २८ फेब्रुवारी रोजी निवड झालेल्या सहभागींना ईमेलने कळवण्यात येईल. तरी आपल्या महाविद्यालयातील इतिहास विषयाच्या प्राध्यापकांना या चर्चासत्रास उपस्थित राहण्यास उत्तेजन द्यावे अशी विनंती आहे. https://tinyurl.com/National-Seminar-History

सस्नेह,

Shradelha.

इतिहास विभाग आणि इतिहास अभ्यास मंडळ